**पुणे जिल्हा परिषद पुणे**
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्लीरोड, कॅम्प, पुणे-४११००१.
सामान्य प्रशासन विभाग, ६ वा मजला
दूरध्वनी क्रमांक ०२०- २६१३४८०६
email-dyceogad.punezp@gmail.com
फॅक्स ०२०-२१३८९२०
Website- www. zppune.org

जा.क्र.साप्र/आस्था-८/२६ /२०२३
पुणे, दिनांक:- ११/ ०१ /२०२३

# सुचनापत्र

**विषय : अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी समुपदेशनास उपस्थित रहाणेबाबत.**

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा/१२१७/प्र.क्र.१०२/आठ दिनांक २१ सप्टेंबर २०१७
२) या कार्यालयाकडील सुचनापत्र जा.क्र.साप्र/आस्था -८/१२२१/२०२२, दि.२२/१२/२०२२
३) या कार्यालयाकडील सुचनापत्र जा.क्र.साप्र/आस्था -८ / १९ /२०२३, दि. ११ /१/२०२३

शासन सेवेत असताना दिवंगत झालेल्या गट- अ ते गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या कुटूंबातील पात्र वारसास त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्तीची योजना कार्यान्वित आहे. सदर योजने अन्वये पुणे जिल्हा परिषदेच्या सेवेत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या ज्या वारसांनी दिनांक १५/१२/२०२२ अखेर या कार्यालयाकडे विहित प्रस्ताव सादर केलेले आहेत, अशा उमेदवारांचे प्रस्ताव शासन निर्णयातील तरतुदीनुसार व अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या पडताळणीनुसार प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करुन संदर्भ क्र.२ अन्वये तात्पुरती प्रतिक्षासूची पुणे जिल्हा परिषदेच्या www. zppune.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली होती.

सदरच्या तात्पुरत्या अनुकंपा प्रतिक्षासूचीबाबत असलेल्या हरकती वा आक्षेप **दिनांक ३०/१२/२०२२ पर्यंत** कागदोपत्री पुराव्यासह या कार्यालयाकडे समक्ष करणेबाबत मुदत देणेत आलेली होती.

तात्पुरत्या प्रतिक्षायादीबाबत प्राप्त झालेल्या आक्षेप वा हरकतींचे निराकरण करुन अंतिम प्रतिक्षासूची तयार करणेत आलेली असून सदरची अंतिम प्रतिक्षासूची ही संदर्भ क्र. ३ अन्वये पुणे जिल्हा परिषदेच्या www. zppune.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेली आहे.

**अंतिम प्रतिक्षासूचीतील सर्व उमेदवारांनी दिनांक १७/०१/२०२३ रोजी सकाळी ११:०० वा पाचवा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे येथील "बहुउद्देशीय हॉल" मध्ये समुपदेशनासाठी वेळेवर उपस्थित रहावे.**

आयुष प्रसाद (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे जिल्हा परिषद,पुणे**